
ग्र. सं. वाचनालय, ठाणें
विषय
दा. क्र. १५५६६

रूप शिवशाही

# आहुती

सौ. रेचल गडकर



IRBK-0115566

२५१९१५८

**नाट्यरूप शिवशाही**

पुस्तक ४ थे

**संपादक : डॉ. म. वि. गोखले**

एम.ए., पीएच्.डी.

**मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.**

**सूचना :–** खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक / मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

सदर नाटिकेचा प्रयोग किंवा वाचन, भाषांतर, रूपांतर करण्यापूर्वी रुपये दहा मानधन पाठवून आगाऊ परवानगी घ्यावी.

पत्ता :– सौ. रेचल आ. गडकर, २९/२०२६ अभ्युदयनगर हाऊसिंग कॉलनी, काळाचौकी, कॉटनग्रीन, मुंबई–३३

प्रकाशिका : सौ. निर्मला नारायण अरगडे, सौ. मालिनी माधव कुलकर्णी
अरगडे कुलकर्णी प्रकाशन १६/२२४ लोकमान्यनगर, पुणे ३०

© सर्व हक्क प्रकाशिकेंच्या स्वाधीन

प्रथमावृत्ती : जून १९७४

मुद्रक : सौ. वसुधा रघुनाथ खरे, अक्षर मुद्रणालय, ४७ इंडस्ट्रियल इस्टेट, नागरगाव, लोणावळा (जि. पुणे)

नाट्यवेड्या बालमित्रांनो,

हा जून १९७४ ! म्हणजे ठीक ३०० वर्षांपूर्वी (जून १६७४ मध्ये) महाराष्ट्राच्या स्वाभिमानाला चेतना देणारी एक महान घटना घडली ! श्रीशिवाजीराजे यांनी हिंदवी राज्याची मुहूर्तमेढ रोवून स्वतःला राज्याभिषेक करून घेतला. हिंदवी स्वराज्याचा हा छत्रपती म्हणजे गुणसागरच होता !

जाणिवेच्या रवीला रसिकतेचा दोर लावून या श्रीशिवचरित्ररूपी गुणसागराचे मंथन केले तर नानाविध गुणांचे नवनीत घुसळून वर येते. साहस, शक्ती, युक्ती, न्यायप्रियता, शिस्तप्रियता, दूरदर्शीपणा, नीतिमानता, संस्कारक्षमता—किती किती म्हणून त्यांचे गुण सांगावे !

अशा या लोकोत्तर पुरुषश्रेष्ठाच्या चरित्रातील निवडक प्रसंगाचे नाट्यरूप दर्शन घडवून, त्यांच्या विविध गुणांचा परिचय आमच्या बालमित्रांना करून द्यावा, यासाठी ही 'नाट्यरूप शिवशाही' निर्माण केली आहे. रंजनाबरोबरच ध्येयसिद्धी असा हा योग आहे. तुम्हाला तो आवडेलच आवडेल !

IRBK-0115566

१९/२७७, लोकमान्यनगर
पुणे ३०
जून १९७४

सूत्रधार—नाट्यरूप शिवशाही

## प्रस्तावना-

सिद्दी जोहरने पन्हाळगडला दिलेला वेढा, त्याने कित्येक दिवस चालविला. शिवाजीराजे गडावरच अडकून पडले. जिजाबाईनी अनेकं जासूद शिवाजीराजांकडे पाठविले; पण कोणीही जोहरच्या वेढ्यातून गडावर येऊ शकला नाही. एक दिवस महादेव नावाचा जासूद मात्र राजांपर्यंत भर पावसात येऊन पोचला. त्याने गडाखालील वेढ्याची जी माहिती दिली त्यामुळे राजांना गडावरून निघून जाण्याची युक्ती सुचली.

यावेळी शिवाजीराजे बाजीप्रभूंबरोबर विशाळगडाकडे निसटून गेले. पण शिवा नावाच्या एका न्हाव्याने मात्र प्रतिशिवाजी बनून, गनिमाला काही वेळ झुलवून, अखेर प्राणांची आहुती दिली. त्याचे चित्र प्रस्तुत नाटिकेंत रेखाटले आहे.

---

# आहुती

पात्र परिचय (प्रवेशानुक्रमे)

शिवाजीराजे– तरुण वय.

महादेव– शिवाजीराजांपर्यंत पोचलेला जासूद

बाजीप्रभू– राजांचा एक शूर सरदार

शिवा न्हावी– शिवाजीराजांसारखाच दिसणारा एक तरुण

त्र्यंबकराव, गंगाधरपंत– राजांचे कारभारी

सिद्दी जोहर– आदिलशाही सरदार, काळा, उंच, धिप्पाड

फाजल– अफझलखानाचा तरुण मुलगा

मसूद– जोहरचा सैन्यप्रमुख

शिवाय सिद्दी जोहरचे शिपाई, जासूद, पहारेकरी वगैरे.

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.
वा. क्र. ५५९८८ नों. दि. २५।१०।७९
वि. नाटक क्र. ..................

## दृश्य १ ले

(पडदा उघडताच एक छोटासा दिवाणखाना दृष्टीस पडतो. शिवाजी महाराज दिवाणखान्यात येरझारा घालीत असतात. इतक्यात महादेव, (जिजाबाईने शिवाजीकडे पाठविलेला जासूद) प्रवेश करून राजांना मुजरा करतो.)

**महादेव** : महाराज !

**शिवाजी** : ये महादेवा, आता कसं काय वाटतंय तुला ?

**महादेव** : ठीक आहे महाराज!

**शिवाजी** : महादेव, आईसाहेबांनी इतके जासूद पाठविले. पण त्यातून फक्त तूच आमच्यापर्यंत येऊन पोहोचलास ...तुझ्या धाडसाची आम्ही तारीफ करतो.

**महादेव** : कसली तारीफ महाराज, अहो, आईसाहेब स्वतःच शत्रूचा वेढा फोडायला निघाल्या होत्या. म्हणाल्या राजांचा मागोवा कुणालाच घेता येत नसेल तर मीच निघते त्या कामगिरीवर. पण मी त्यांना थोपविलं आणि निघालो कामगिरीवर...

**शिवाजी** : म्हणूनच म्हणतोय महादेवा, तुझ्या धाडसाचं कौतुक करावं तितकं थोडंच आहे. तू दिलेल्या माहितीवरूनच आम्हाला एक युक्ती सुचली ...

**महादेव** : महाराज, एक विचारू... ?

**शिवाजी** : विचार विचार अवश्य...

**महादेव** : महाराज, आपन उद्या सिद्दीच्या भेटीला स्वतः जाणार असल्याचं ऐकलं...

**शिवाजी** : होय, उद्या आम्ही सिद्दीच्या भेटीला जाणार असल्याचं पत्र

सिद्दीकडे रवाना झालं आहे... तू दिलेल्या माहितीचा उपयोग करून घ्यायच ठरविलंय आम्ही...

**महादेव** : (कळवळून) महाराज, माझ्या काय बी ध्यानात येत नाही बघा... पन आपन सिद्दीच्या भेटीला जानं धोक्याचं वाटतंय महाराज, रागावू नगा... गरिबाच्या मनाला वाटलं ते बोललो...

**शिवाजी** : महादेव, तुझ्यावर कसा रागावेन मी. अरे, तुझ्या आमच्यावरील निष्ठेची मला कल्पना का नाही ... ... ... सिद्दीचे सैनिक डोळ्यात तेल घालून पहारा करीत असताना त्यांच्या पाहाऱ्यातून स्वतःचा जीव धोक्यात घालून तू इथवर येऊन पोहोचलास ... ... ... का! कशासाठी! तुला का तुझ्या जिवाची पर्वा नाही! तुझ्या जिवाचं तुला मोल नाही! नाहीतर आमचे कितीतरी स्वकीय आपल्या प्रतिष्ठेसाठी, मानासाठी, आमची मान छाटण्यासाठी टपून बसले आहेत! ज्या शत्रूनं त्यांच्या बायका मुलांची कत्तल करून धुमाकूळ घातला, अनेक प्रकारे त्यांच्यावर अन्याय केला, त्या शत्रूलाच ते आपल्या एका बांधवाविरुद्ध मदत करताहेत! महादेवा, अरे प्रतिष्ठा आणि मान यासाठी हापापणारी माणसे फक्त दुसऱ्याचा विश्वासघातच करू शकतात... उलट, तुम्ही! तुमच्यासारखी निष्ठावंत माणसे माझ्या पाठीशी उभी आहेत, म्हणूनच स्वराज्याची वाटचाल करणं मला शक्य झालं आहे. महादेव, तू चिंता करू नको... आमचा इरादा फार वेगळा आहे! तू निवांत विश्रांती घे!

**महादेव** : जी महाराज!

(महादेव निघून जातो. शिवाजीराजे इकडून तिकडे येरझारा घालू लागतात.)

□ □

## दृश्य २ रे

(गडावरचा एक भाग. सरदार बाजीप्रभू उतावीळपणे कोणाची तरी वाट पहात असतानाच एक सैनिक येऊन त्यांच्याशी कानगोष्ट करतो. बाजी त्याला काही सांगतात. तो घाईने जातो. इतक्यात शिवा न्हावी घाईघाईने प्रवेश करतो. शिवा दिसण्यात बराचसा शिवाजीराजांसारखाच असतो. राजांप्रमाणेच त्यानेही दाढी राखलेली असते.)

**शिवा** : (मुजरा करून) सरदारसाहेब!

**बाजी** : (वळून) ये शिवा, ये. तुझीच वाट पहात होतो मी...

**शिवा** : जी...?

**बाजी** : (एकटक शिवाकडे पहातो आणि नजर वळवून) शिवा, तू दिसायला अगदी महाराजांसारखाच आहेस नाही ...

**शिवा** : (घाबरून) आँ ! आपण काय बोलतायसा...... महाराज कुठं आणि म्या कुठं...... आव हृचे लोक उगाच कायतरी येड्याबानी मस्करी करत्यात बगा...

**बाजी** : (हसून) कोण मस्करी करतात... ?

**शिवा** : आव हृचेच आमचं लोक...

**बाजी** : काय मस्करी करतात ... ?

**शिवा** : आव, काय विचारू नगा... त्यांचं काय बी खरं नाही बघा.

**बाजी** : म्हणजे तू महाराजांसारखाच दिसतोस असंच म्हणतात ना ते.

**शिवा** : (लाजून) व्हय व्हय ! पन् आपल्याला कसं कळलं हे.

**बाजी** : अरे, कळायला कशाला पाहिजे. गेले आठ दहा महिने आम्ही तुला रोज पाहातोय.

**शिवा :** पन् सरदार ते काय बी खरं नाही बघा...

**बाजी :** (गंभीर होऊन) शिवा, खरं आहे ते. तुझी उंची, अंगलट, चेहरा, अगदी राजांसारखा आहे...... तू त्यांचे कपडे घातलेस ना...... तर कुणी सुद्धा ओळखणार नाही तुला !

**शिवा** · छे, छे ! अवं त्यांच्या म्होर उभं राहाण्याची देखील माझी लायकी नाही आणि त्यांचे कपडे...... सरदार मी पाया पडतो. माझं काही चुकलं असलं तर माफ करा (शिवा बाजीचे पाय धरतो.)

**बाजी :** शिवा उठ, अरे! थट्टा करीत नाही मी तुझी (गंभीर होऊन) खरंच मला एका प्रतिशिवाजीची जरुरी आहे आज...... तो जर मिळाला तर सिद्दीच्या तावडीतून राजांची मुटका करता येईल. नाहीतर...... नाहीतर स्वराज्याची स्वप्नं इथचं खुंटणार आहेत. शिवा, बोल आहेस तयार......? (बाजी शिवाचे दोन्ही खांदे पकडतो. शिवा भीतीने व लाजेने मान खाली घालतो.)

**शिवा :** सरदार आपन काय बोलता...? या गरीबाच्या काय बी ध्यानात आलं नाही बघा...!

**बाजी** : शिवा, नीट ऐक ! राजांनी उद्या सिद्दीच्या भेटीला जाण्याचं कळविलं आहे. पण...... त्याला उद्याच्या गुंगीत ठेवून आज पहाटेपूर्वीच गडावरून सिद्दीचा वेढा फोडून पळून जाण्याचा इरादा आहे. पण हे काम सोपं नाही शत्रू डोळयात तेल घालून पाहारा करतोय म्हणूनच दुसऱ्या बाजूने प्रतिशिवाजीची पालखी मार्गस्थ करावयाची आहे. शत्रूला आमचा सुगावा लागलाच तर......पालखीतून राजे सिद्दीकडे जात असलेले शत्रू सैन्याला दिसतील. शत्रू गोंधळेल. आमचा पाठलाग सोडील. आणि आम्हाला राजांसह विशाळगडावर पोहोचता येईल...... पण त्याकरिता प्रतिशिवाजी हवा.

**शिवा :** महाराजांच्या सेवेसाठी हा शिवा कायबी करायला तयार आहे. बोला काय आज्ञा आहे...?

**बाजी** · शिवा, तू प्रतिशिवाजी होऊन पालखीतून सिद्दीकडे जायचं... बोल आहेस कबूल...?

**शिवा** : एकदम कबूल!

**बाजी** कबूल! पण शिवा, हे काम तितकं सोपं नाही...तुझ्यामुळे कदाचित

आम्ही सुटून जाऊ... पण तू...! तू सिद्दीच्या तावडीतून सुटणे कठीण...

**शिवा :** सरदार, त्याचा तुमी काय बी विचार करू नगा... हा गडी काय वाटयाला येईल ते भोगायला तयार आहे. तुम्ही फकस्त आज्ञा द्या.

**बाजी :** नाही नाही शिवा, मला तुझा पण विचार करायला हवा... काय करावं काही सुचेनासं झालंय. शत्रूला सरळ सरळ सामोरे जावे तर शत्रूचा जोर भारी आहे... एकमार्गी पळून जावे तर धोका आहे. भवानीमातेची काय इच्छा आहे कोण जाणे!

**शिवा :** आपन काय बी विचार करू नगा. अवो, तुमच्या लाखमोलाच्या बेतात या शिवाला मरण आलं तर तो ते आनंदाने स्वीकारील. या जिवाचं सोनं होईल... मी तयार आहे... मला आज्ञा द्या... (बाजी काहीच बोलत नाही) आज्ञा द्या सरदार!

**बाजी :** ठीक आहे शिवा, तू प्रतिशिवाजी बनून पालखीतून सिद्दीकडे जायचंस. ठरलं! आता तू जा. तुझ्या कामाची व्यवस्था लावून ये. वेळ थोडा राहिलाय...

**शिवा :** ठीक आहे. येवढ्यात येतो...

(शिवा आनंदाने निघून जातो)

□ □

## दृश्य ३ रे

(पुन्हा दिवाणखान्याचे दृश्य. शिवाजीराजे विचारमग्न होऊन येरझारा घालत असतात. इतक्यात बाजीप्रभू प्रवेश करून शिवाजीला मुजरा करतो)

**बाजीप्रभू** : महाराज,

**शिवाजी** : बाजी, सर्व तयारी झाली...?

**बाजीप्रभू** : होय महाराज, गडाची वाट दाखविण्यासाठी महादेवाबरोबर म्होरक्यांची तुकडी रवाना केली आहे. आपल्याबरोबर न्यावयाचे सामान बांधून तयार आहे. आणि--- (महाराजांच्या कानात काही सांगतो.)

(इतक्यात त्र्यंबकराव व गंगाधरपंत प्रवेश करतात.)

**बाजी** : या या त्र्यंबकराव, गंगाधरपंत, अगदी वेळेवर आलात...त्र्यंबकराव, सिद्दी जोहरकडे जाण्यासाठी दुसरा मेणा तयार करा...

**त्र्यंबकराव** : दुसरा मेणा! (सर्वजण एकमेकांकडे पहातात.)

**बाजी** : होय, दुसरा मेणा ! या मेण्यांतून प्रतिशिवाजीराजे सिद्दी जोहरकडे जातील.

**गंगाधरपंत** : महाराज, आम्ही काहीच समजलो नाही ! प्रतिशिवाजी कोण ?

**शिवाजी** : ते आपल्याला कळेलच इतक्यात. (त्र्यंबकराव जातात.)

**गंगाधरपंत** : महाराज, बाहेर पावसाने तर थैमान मांडलंय. वाट अवघड आहे. शत्रू भारी आहे. तेव्हा काळजीने पुढे सरकावे. गडाची काळजी करू नये.

**शिवाजी** : आज पावसाचा जोर वाढलाय ही देखील निसर्गाचीच कृपा म्हणायला हवी. पावसाच्या माऱ्याने तरी शत्रू थोडासा बेसावध राहील. शत्रूला

आमची चाहूल लागणे कठीण होईल. गंगाधरपंत, निसर्गाने माणसावर कृपा करायचीच ठरविली तर त्याच्या कृपेला अंत नसतो.

**गंगाधरपंत :** तेही खरंच आहे महाराज, कितीतरी वेळा आपण निसर्गाच्या कृपेमुळेच शत्रूच्या तावडीतून सुटलो आहोत. याही वेळी निसर्ग आपल्या पाठीशी राहील. तरीही काळजी वाटते ... ... ...

**शिवाजी :** गंगाधरपंत, आपण आमची काळजी करू नका. सिद्दीला आम्ही त्याच्या भेटीला येत असल्याचा निरोप गेलेला आहे. आमचा मेणा बाहेर पडताच दुसरा मेणाही बाहेर पडेल. हा मेणा पहारेकऱ्यांच्या नजरा न टाळता पुढे जात राहील आणि आम्हाला पुढे सरकता येईल. यात आम्ही अपयशी ठरलोच तर सिद्दीच्या भेटीला प्रत्यक्षच जावू. वेळ कठीण आहे. परंतु त्यातून मार्ग काढल्यावाचून गत्यंतर नाही. वेढा उठण्याची चिन्हे नाहीत. ठीक आहे. भवानीमाता पाठीशी आहे.

**बाजीप्रभू :** महाराज, आपण वेढ्यातून बाहेर पडा. आपल्याला विशाळगडावर सुखरूप पोहोचविण्याची जबाबदारी माझी ... ... काय वाटेल ती संकटे आली तरी हा पठ्ठा मागे सरणार नाही.

**शिवाजी :** ठीक आहे. पाहू या श्रीची काय इच्छा आहे ती ... ...

**त्र्यंबकराव :** (प्रवेश करून) महाराज, सिद्दीकडे जाण्यासाठीं दुसरा मेणा तयार आहे.

**बाजी :** ठीक आहे. येतीलच इतक्यात प्रतिशिवाजीराजे

(इतक्यात शिवा न्हावी शिवाजीच्याच पोषाखात प्रवेश करून महाराजांना मुजरा करतो)

**बाजी :** हे पहा, हे आले प्रतिशिवाजीराजे. गंगाधरपंत, कशी काय वाटते आमची निवड तुम्हाला ... ... ?

(शिवा छाती फुगवितो व अभिमानाने सर्वांकडे पाहातो. सर्वजण आश्चर्याने त्याच्याकडे पाहातात.)

**गंगाधरपंत :** अगदी बरोबर ! आपली निवड चुकणार नाही बाजी !

**बाजीप्रभू :** महाराज, किल्ल्यावर याला सर्वजण आपल्या नावाने चिडवीत असतात. अगदी हुबेहूब आपल्यासारखा दिसतो म्हणून ... ...

**शिवाजी :** होय ना ! त्याचाच फायदा घेऊन आज फार मोठी जबाबदारी

आम्ही शिवावर सोपवीत आहोत. शिवा, आहेस ना तयार !

**शिवा :** महाराज, अहो तयार म्हणजे ... ... ! शंका आहे होय !

**शिवाजी :** (शिवाकडे पाहात) शिवा, प्रतिशिवाजी होणं सोपं नाही. तुझ्यामुळे आम्ही सुटून जाऊ पण तू ! तू सिद्दीच्या हातून सुटणं कठीण. आमच्या वरच्या रागाचं उट्टं सिद्दी तुझ्यावर काढील. शिवा, शिवा मला कल्पनाच करवत नाही ... ... म्हणूनच आम्ही अजून विचार करतो आहोत ... ...

**शिवा :** महाराज, पाय धरतो. एकदा केलेला विचार बदलू नका. भवानीमातेची शपथ आहे तुम्हाला. आवं हा शिवा पडला तर त्याच्या जिवाचं सोनं व्हईल. आपन् वाचलात तर राज्य वाचंल आणि राज्य वाचलं तर माझ्यासारखे हजारो शिवा न्हावी जन्माला येऊन या स्वराज्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देतील. मन बारीक करू नका महाराज...

(राजे त्याच्या कमरेला दुशेला बांधून त्यात तलवार अडकवितात. आणि जरी चढाव दाखवून म्हणतात–)

**शिवाजी :** शिवा, चढाव पायात घाल.

**शिवा :** (मागे सरकून) नाही नाही महाराज ! (शिवा चढाव हातात घेऊन छातीशी कवटाळतो.) महाराज, या जोड्यांच्या जवळ उभे राहण्याची देखील माझी लायकी नाही आणि हे जोडे मी पायात घालू.. !

**बाजी :** शिवा, अरे जोडे पायात घाल. असा रडका शिवाजीराजा कामाचा नाही. नाहीतर आमची अब्रू जायची...

**त्र्यंबकपंत :** तर काय ! महाराज, हा काय जाणार शत्रूसमोर ?

**शिवा :** (पायात चढाव घालतो आणि तलवारीवर महाराजांसारखा हात ठेवून म्हणतो) अरे जा ! बाजी, कोण म्हणतो आम्ही रडवे आहोत म्हणून ! दाखवितो एकेकाला आमचा पराक्रम !

(पडदा पडतो.)

□ □

## दृश्य ४ थे

( गडावरचा एक भाग )

**शिवाजी :** (आपल्या गळ्यातला मोत्याचा कंठा आणि कवड्यांची माळ त्याच्या गळ्यात घालीत म्हणतात.) शिवा, हे भोसले घराण्याचं खरं लेणं, भवानी मातेचा प्रसाद ! देवीच्या भक्ताची खूण ! हिला कमीपणा येईल असं वर्तन करू नकोस. जिवाच्या भीतीनं ही माळ भ्रष्ट करू नकोस. या माळेला साजेसा पराक्रम दाखवून तिचा मान राख. या माळेची इज्जत आता तुझ्या हातात आहे. मोहाला बळी पडू नकोस. मराठ्यांची शक्ती, मराठ्यांची प्रतिष्ठा, मराठ्यांचं इमान शत्रूला दाखवून दे. शिवा, सिद्दी कशालाही फसला नाही तरी या माळेला खास फसेल ..

**शिवा :** महाराज, तुम्ही काही काळजी करू नका. हा शिवा आपल्या जिवा-वरून स्वतःचा जीव लाखदा ओवाळून टाकील. आपण निर्धास्त असा.

**शिवाजी :** शिवा, एक राहिलं– (शिवाजी महाराज आपल्या कानातील चौकडा काढून शिवाच्या कानात घालतात. मघापासून थोपवून धरलेले राजांचे अश्रू एकदम बाहेर पडतात. दुसरा चौकडा राजे शिवाच्या हातात देतात. गळा दाटून येतो. न राहून ते शिवाला मिठी मारतात.) शिवा, शिवा या राजेपणाचा याचसाठी तिटकारा येतो. प्रत्येक क्षणाला लाख मोलाचे जीव खर्ची घालावे लागताहेत. तुझ्यासारखे इमानी सेवक माझ्यासाठी प्रत्येक क्षणाला आपल्या प्राणांची आहुती देतात. का?... कशासाठी...? कुणा-साठी...? तुम्हाला का घरसंसार नाही, का जगण्याची इच्छा नाही ! त्या-पेक्षा असं वाटतं फेकून द्यावं हे राजेपण ! . नाहीतर शत्रूला सरळ सामोरं जावं आणि होऊ द्यावं काय होईल ते जिवाचं...

**शिवा :** महाराज, महाराज शांत व्हा. इतकं मन हलकं करू नका.

**शिवाजी :** नाही नाही शिवा, याच ठिकाणी माझं हृदय फाटतं, मन आक्रंदून उठतं आणि उरला सुरला धीर खचून जातो. ... शिवा, माझ्यासाठी मरण पत्करणारा तू...! आणि मी... मी तुझ्या अंगावर पोषाख चढवितोय, तुला दागिन्यानी चढवितोय... अरेरे! शिवा, शिवा किती क्रूर थट्टा चालविलय रे मी तुझी... (तोंड फिरवितो)

**बाजी :** महाराज, वाईट वाटून घेऊ नका. आमच्यासारखे लाख मेले तरी लाख वेळा पैदा होऊन तुमच्या सेवेला हजर होतील. पण लाखांचा पोशिंदा गेला तर...... या रयतेचं काय होणार? कोण विचारणार त्यांना? त्यांची बायकापोरं उघड्यावर येतील. त्यांना कोणीच वाली उरणार नाही......

**शिवा :** महाराज, बाजीराव म्हणतात ते खरं हाय. माज्यासाठी तुमी टिपं गाळू नका. आज शत्रूच्या हातून कसायासारखी कत्तल होत असलेल्या बायकामुलांना तुमच्या छत्राची गरज हाय. आपनच गेलात तर शत्रूला रान मोकळं होईल. मराठी राज्याची राखरांगोळी होईल...... महाराज, मन घट्ट करा...... आणि स्वराज्याकडं वाटचाल करा......

**शिवाजी :** शिवा !

**शिवा :** होय महाराज, आवो मेल्यानंतर रडणारे पुष्कळ असत्यात पन जितेपनी, एका साध्या शिपाई गड्यासाठी रडणारे फार थोडे! महाराज आज माज्यासाठी आपन टिपं गाळलीत! या आपल्या एकेका टिपासाठी हा शिवा लाखदा मरण पत्करील. तुमी वाईट वाटून घेऊ नका. सुखरूप जा...... जिवात जीव असेपर्यंत हा शिवा आपली शान राखील. विश्वास ठेवा.

**शिवाजी :** शिवा, शिवा! तुझी धन्य आहे! माझ्या मोत्याच्या कंठ्यातला एकेक पाणीदार मोती गळून पडतोय......

**बाजीप्रभू :** पन त्या मोत्याचं सोनं होतंय महाराज, माती नाही! ... प्रत्येक गडी आपल्या पराक्रमानं मोठा होतोय. मरण कोणाला चुकलंय...!

**शिवाजी :** जशी भवानीमातेची इच्छा! चला बाजी, वेळ होत आली.. आपल्याला निघालं पाहिजे.

**बाजी :** हो, हो, चलावं महाराज ! ...

**शिवाजी :** चला, त्र्यबंकराव, गंगाधरपंत आम्ही शत्रूच्या हाती गवसलोच तर जिवात जीव असेपर्यंत गड लढवा. आम्ही सुखरूप पोहोचलोच तर आपल्याला मदत करूच (शिवाकडे वळून) चल शिवा. दोघे एकदमच रवाना होऊ...... (शिवा, शिवाजी महाराजांच्या पायावर डोके ठेवतो. शिवाजी मन घट्ट करून त्याला उठवितो) चला......

**गंगाधरपंत :** महाराज, सुखरूप जा. काही काळजी करू नका.

**शिवाजी :** पंत, आम्ही जाताच गडाचे दरवाजे लावून घ्या... चला बाजी, आता आमची भिस्त तुमच्यावर...... चला......

(सर्व जातात.)

□ □

## दृश्य ५ वे

(पडदा उघडताच सिद्दी जोहारचा डेरा दृष्टीस पडतो. सिद्दी मद्याने धुंद होऊन गादीवर लोळत पडलेला असतो. इतक्यात एक सेवक जोराने ओरडत आत प्रवेश करतो)

**सेवक** : हुजूर, शिवाजी भाग गया। शिवाजी भाग गया।

(त्याचे बोलणे थांबते न थांबते तोच सिद्दी त्याच्या एक मुस्कटात देतो)

**सिद्दी** : शिवाजी भाग गया ! कैसे...? (मोठ्याने ओरडतो)

(इतक्यात दुसरा सेवक ओरडत प्रवेश करतो)

**दुसरा सेवक** : हुजूर, शिवाजी भाग गया।

(सिद्दी त्याच्याकडे धावतो. व त्याच्या दोन मुस्कटात देतो)

**सिद्दी** : अच्छा! भाग गया ! तुम क्या करते थे ?

**तिसरा सेवक** : (धावत आत येतो. परंतु दोन सेवक खाली मान घालून उभे राहिलेले पाहून भीतीने अडखळत अडखळत बोलतो) हुजूर, शि...शिवाजी ... भाग... भाग गया ... हाँ शिवाजी भाग गया...

**सिद्दी** : (त्याच्या गालांवर थपडांचा वर्षाव करीत) अच्छा, भाग गया क्या — ! जाव यहाँसे जाव – – – (मोठ्याने ओरडतो) मसूद ऽऽ मसूद कहाँ है ?

**एक सेवक** : मसूद शिवाजी का पीछा करने गया है।

**सिद्दी** : अच्छा! तो शिवाजी का पीछा करनेके लिये अभी गया है। पहले क्या करता था ?

**एक सेवक** : मुझे मालूम नहीं हुजूर, मैं ... मैं तो इधर पहारा दे रहा था...

**सिद्दी** (त्याच्याकडे धावत जाऊन) अच्छा, तू पहारा यहाँ दे रहा था ... कंबख्त ! शिवाजी वहाँसे भाग गया और तू यहाँ पहारा दे रहा था ... (एक मुस्कटात देतो.) जाव भागो यहाँसे उसका पीछा करो... जाव ... सब जाव ... (सेवक जातो) शिवाजी भाग गया ... हं... शिवाजी भाग गया ... (फाजल प्रवेश करतो)

**फाजल** : देखा आपने वो कंबख्त कितना चालाख है ।

**सिद्दी** : अरे हाँ हाँ ... तो हम भी कुछ कम नहीं । मेरे हाथ आने दो... मैं देखता हूँ उसको ...

**फाजल** : जब वह आयेगा तब... ! लेकिन मैं पूछता हूँ ये हमारी फौज इतनी गाफील कैसी रही...

**सिद्दी** : मैं भी वहीं सोचता हूँ ... ! ये देखिये फाजल, शिवाजी भाग जानेमें जो लोग जिम्मेदार हैं उन सब लोगोंको शिक्षा होनी चाहिये ।

**फाजल** : हाँ हाँ ... ! जरूर होगी...

**सिद्दी** : अगर वह मेरे हाथमें आ जाय तो मैं उसको जिंदा नहीं छोडूंगा...

**फाजल** : मैं भी अब्बाजानकी मौत का पूरा बदला लूंगा ...

**सिद्दी** : फाजल, तुम भी आगे बढो ... देखो वो कंबख्त कहाँ है ।

**फाजल** : हाँ हाँ ... अभी जाता हूँ ... ... !

(फाजल जातो. सिद्दी स्वतःशीच बोलतो. नशा उतरलेली आहे.)

**सिद्दी** : शिवाजी भाग गया ... ... ! ये कैसे हो सकता है ! ओ तो मेरे पास आनेवाला था ... ... ! जिसने अफझलखानको धोखा दिया उसको मैं पकडके बादशहाके सामने ले जानेवाला था ... ... ! ये क्या हुआ ... ... अभी बादशहाके सामने जानेमें भी शरम आयेगी ... ... ! या अल्ला ऽ ऽ ! ओ मेरे हाथ आने दो ... ... (वर पाहातो)

(इतक्यात एक सेवक जोराने ओरडत येतो.)

**एक सेवक** : हुजूर हुजूर, शिवाजी पकडा गया. शिवाजी पकडा गया, मसूद उसको गिरफदार करके लाता है ।

(नाचू लागतो. इतक्यात दुसरा सेवक ओरडत येतो.)

**दुसरा सेवक** : हुजूर हुजूर, पकडा गया (जीभ चावून) शिवाजी पकडा गया ... ...

**तिसरा सेवक** : हुजूर, शिवाजी पकडा गया ... ... आपकी जीत हुओी ... ... (हसतो)

**सिद्दी** : अरे, हाँ हाँ पकडा गया पकडा गया ... लेकिन वह है कहाँ ... !

**पहिला सेवक** : हुजूर, मसूद उसको लाता है। बहुत नजीक आये हैं। आपकी जीत हुओी हुजूर, आपकी जीत हुओी–

**सिद्दी** : (त्याच्या अंगावर रत्नजडित माळ भिरकावितो) जीत तो होनेवाली ही थी ... ... ओ क्या समझता है ? अिस शेरके हाथसे वह चूवाँ कभी नही छुटनेवाला था ! समझे ... ... ! अभी मैं उसको देखता हूँ।

(इतक्यात बाहेर गडबड उडते. 'शिवाजी आ गया, 'शिवाजी आ गया,' मसूद पुढे येतो. त्याच्याबरोबर आणखी दोन सेवक येतात व त्यांच्या मागोमाग शिवाजीच्या वेषातला शिवा न्हावी काहीच घडले नाही अशा थाटात रुबाबात पावले टाकीत प्रवेश करतो. आत आल्याबरोबर तो आजूबाजूचे निरीक्षण करतो आणि त्याची दृष्टी सिद्दीवर स्थिरावते. सिद्दीही थोडावेळ त्याच्याकडे पाहातो.)

**शिवा** : (हसून) आप सिद्दीसाब है ?

**सिद्दी** : हाँ हाँ राजे, मैं सिद्दीजोहार हूँ।
राजे, आप भाग जा रहे थे ... ?

**शिवा** : बिलकुल नाही. आम्ही आपल्याकडेच यायला निघालो होतो. वाटेत आपले लोक आमच्याकडे दौडत येताना दिसले. वाटलं आमच्या स्वागतासाठीच सिद्दीसाबनी फौज पाठविली असणार – – क्यों सिद्दीसाब !

**सिद्दी** : सच है ना (अडखळत) हाँ हाँ सच है, सच है – – (हसतो) मसूद, अब तुम लोग जा सकते हो – –

**मसूद** : जीं हुजूर – –

(सर्वजण जातात. फाजल, शिवा आणि सिद्दीच उरतात.)

**सिद्दी** : राजे, आप तो बडे बहादूर हो। आपके बारेमें मैंने बहोत सुना है।

बैठिअे – –

(आसनाकडे बोट दाखवितो)

**फाजल :** (रागाने) हाँ हाँ जोहार, इस दुष्मनकी तारीफ क्या करते हो ! जिसने आब्बाजानकी कत्तल की। जिस तलवारसेही मैं जिसका सर उडा दूंगा। (तलवार उपसतो.)

**सिद्दी :** (फाजलला अडवीत) हाँ हाँ फाजल, राजे हमारे मेहमान है। राजे, आप बैठिए.

**शिवा :** (आसनावर शिवाजीची पोझ घेऊन बसतो) शुक्रिया।

**सिद्दी :** राजे, आप तो बारीशसे भीग गये है ! शराब पीओगे ?

(सिद्दी सुरईतून मद्य पेल्यात ओतून पेला शिवाच्या हाती देतो.)

**शिवा :** (मद्याचा पेला चटकन ओठाला लावतो परंतु लगेच शंका येऊन पेला मागे घेतो.) सिद्दीसाब, आप नही पीयेंगे ?

**सिद्दी :** ओ...क्यूं नहीं, क्यूं नहीं (स्वत: त्याच सुरईतील मद्य पेल्यात ओतून घेतो व पिऊ लागतो)

(फाजल रागाने निघून जातो. शिवा मद्याचा पेला रिकामा करतो.)

**शिवा :** सिद्दीसाब, आपली फौज देखील शूर आणि हिंमतवाली आहे. आम्ही आपल्या फौजेची तारीफ करतो...

**सिद्दी :** शुक्रिया ! राजे, इस वक्त तो आपको हमारे सामने हार खानी पडी...

**शिवा :** ओ... ! बिलकुल नही... ! आम्ही आपल्याकडे तहाची बोलणी करायला आलोय. हार मानायला नाही...

**सिद्दी :** ओ... ! तो आप हार नही मानते !

**शिवा :** बिलकुल नही. सिद्दीसाब, आम्ही तुमच्याकडे तडजोडीसाठी आलोत. आपलं म्हणणं ऐकायला आलोत...

**सिद्दी :** (हसून) राजे, अब आप तो मेरे पंजेमें है। कबूल ... ?

**शिवा :** सिद्दीसाब, सिंह लांडग्याच्या पंजात कधी राहात नाही. तो लांडग्याला। आपल्या पंजात पकडतो...

**सिद्दी :** मतलब...?

शिवा : मतलब कुछ नही सिद्दीसाब, आपके सवालका जवाब दिया...

सिद्दी : ओ...! मैं आपको पुरी तरहसे जानता हूँ। आपने अफझलखानको ऐसाही धोखा दिया था...

शिवा : धोका आम्ही नाही दिला सिद्दीसाब, तोच आम्हाला धोका करण्याच्या तयारीनं आला होता. आणि त्यानं तसा प्रयत्न केलाही.

सिद्दी : ये सब झूठ है।

शिवा : ये झूट नही, सच हैं। अगर आपको विश्वास नही तो उपर जाके उसको पूछो... अभी तो वह झूठ नही बोलेगा...?

सिद्दी : राजे, बहोत हो गया। जादा बकवास बंद करो...आज तुम मेरे कैदी हो...समझे।

शिवा . शिवाजी तुम्हारा कैदी कभी नही हो सकता समझे...!

सिद्दी तो आप क्या करेंगे...?

शिवा : (अडखळतो परत स्वतःला सावरून) आता तर आम्ही काहीच करू शकत नाही. करणार होतो.

सिद्दी : तो राजे, आप भाग जा रहे थे? (हसतो)

शिवा हाँ हाँ जमलं तर पाहावं हा आमचा इरादा होता.

सिद्दी : अच्छा ! तो फिर क्या हुआ ?

शिवा : जमलं नाही. मागे फिरलो. आणि ठरल्याप्रमाणे आपल्या भेटीस दाखल झालो.

सिद्दी . ओऽऽहो ! बहोतखूब ! बहोतखूब ! राजे आप तो बडे बहादूर हो... भागजाने वाले ... कहाँ जा रहे थे ?

शिवा : आम्ही पळून कुठे जाणार होतो हे सांगण्याची जरुरी नाही सिद्दीसाब, पण आम्ही तुमच्या तावडीतून सुटलो असतो तर पुन्हा गवसलो नसतो.

सिद्दी : ओ...! तो राजे आपको अिस वक़्त किस्मतने धोका दिया... (हसू लागतो)

शिवा . हमारी किस्मत हमेशा धोका नही देती !

सिद्दी . ओ...! लेकिन आज तो समझना होगा !

शिवा : सिद्दीसाब, आम्ही लोक आमच्या नशिबावर हवाला ठेवून चालत

नाही. आमचा हवाला असतो आमच्या मनगटावर--! त्यात जोर असेपर्यंत नशिबाला आम्हाला धोका देण्याची ताकत नसते...

**सिद्दी :** अच्छा ... ! तो राजे, आप भाग क्यों जाते थे ... ?

**शिवा :** कभी कभी अैसा करना ही पडता है।

**सिद्दी :** क्यों...! तुम्हारी बाहोंमे ताकद नही...?

**शिवा :** सिद्दीसाब, कभी कभी शक्तीसे युक्ती जादा काम आती है।

**सिद्दी:** अच्छा...! बहोत खूब! बहोत खूब! राजे, तो आप बडे चालाख भी है। (हसतो) लेकिन आज तुम्हारी शक्ती, तुम्हारी युक्ती कुछ भी काम नही आयेगी समझे...! तुम्हे हार माननी ही पडेगी !

**शिवा :** शिवाजी तुम्हारे सामने कभी हार नही मानेगा!

**सिद्दी :** राजे, तुम्हे हार माननी ही पडेगी... बोलो तुम्हारे सब किल्ले मुल्क हमे सोंप देनेको आप तैयार है या नही... ?

**शिवा :** बिलकुल नही... ! सिद्दीसाब, आमच्या मुलखात धुमाकूळ घालून परत आमच्यावर हुशारी. हा मुलुख आमचा आहे .. हे राज्य मराठ्यांचं आहे. तुमच्या बापाचं नाही... समझे...!

**सिद्दी :** राजे...! जबान संभलकर बोलना नही तो बाहर खींची जायेंगी...

**शिवा :** हं .. या धमक्या बंद करा सिद्दीसाब, आणि मुकाट्यानं इथून चालते व्हा बाइज्जत ...!

**सिद्दी :** अच्छा तो तुम अिस तरह माननेको तैयार नही... (तलवार उपसतो)

(शिवाही तलवार उपसतो)

**शिवा :** बिलकुल नही... !

**सिद्दी :** ओ... बडे बहादूर... राजे, आप आपको सिंह कहते है... ! लेकिन यह सिंह आज पिंजडेमे पकडा गया है। तुम्हारी ताकद आज पिंजडेमे बंद है... मालूम है... ? (हसतो)

**शिवा :** शिवाजीची ताकद पिंजऱ्यात बंद होऊ शकत नाही सिद्दीसाब, अगर हिंमतसे लडना हो, तो अकेले सामने आ जाव नही तो तुम्हारी फौज को पुकारा करो.

**सिद्दी :** खामोश बत्तमीज... !

(इतक्यात दोनतीन हेजीब एकदम आत शिरतात आणि घाईघाईने सिद्दीच्या कानात काहीतरी सांगतात. सिद्दी रागानें लाललाल होतो. व एकदम ओरडतो---)

**सिद्दी** : क्या...! क्या बोलते हो...! शिवाजी भाग गया...सचमुच शिवाजी भाग गया--तो यह कौन है --! फाजल --! फाजल --! इधर आओ --जलदी --

**फाजल** : (धावत येतो) क्या हुआ?

**सिद्दी** : फाजल --शिवाजी भाग गया--

**फाजल** : शिवाजी भाग गया--! तो यह कौन है--?

(सर्वजण शिवाकडे पहातात. शिवा शिवाजीसारखी पोझ घेऊन न घाबरता ऐटीत उभा रहातो. त्याच्या दोन बाजूला दोन सेवक हातात तलवारी घेऊन उभे रहातात. सिद्दी रागाने लाललाल होऊन शिवाकडे धावतो. त्याच्या मागोमाग फाजल धावतो)

**सिद्दी** : (रागाने) बोल, कंबख्त तुम कौन हो?

**शिवा** : (शांतपणे) शिवाजी.

**सिद्दी** : झूट--! सच्चा शिवाजी भाग गया--

**शिवा** : तेही खरं आहे.

**सिद्दी** : मतलब--!

**शिवा** : सिद्दीसाब, शिवाजीराजे आपल्या हाती गवसण्याइतके मूर्ख नाहीत समझे--! एव्हाना ते पोहोचलेही असतील (हसू लागतो)

**सिद्दी** : फिर तुम कौन हो--?

**शिवा** : शिवा न्हावी म्हनत्यात मला--शिवाजी महाराजांचा सेवक हाय मी समझे--!

**सिद्दी, फाजल** : दगा दगाऽऽ --शिवाजी का पीछा करो, शिवाजी का पीछा करो जाव--सब जाव--

(सर्व जण जातात. सिद्दी शिवाच्या अंगावर धावून जातो व आपली तलवार त्याच्या छातीवर टेकवितो) इसका नतीजा मालूम है- ?

**शिवा** : (तलवार हाताने बाजूला सारून) क्यों नहीं--? चांगलं माहिती आहे. सिद्दीसाब, जिवाची भीती असती तर इथपर्यंत आलोच नसतो. रस्त्या-

तूनच पळ काढला असता. सिद्दीसाब, आम्ही शिवाजीचे इमानी सेवक आहोत. आमच्या राजाच्या जिवावरून आमचा जीव आम्ही लाखदा ओवाळून टाकतो. खाल्ल्या मिठाला जागतो. बेईमान होत नाही. मृत्यूला आम्ही पाठीवर घेऊन फिरतो. त्याची पर्वा नाही आम्हाला – –

**सिद्दी** : हरामखोर ! दगाबाज – – !

**शिवा** : सिद्दीसाब, आता कशाला ओरडता ? आमचा सिंह केंव्हाच शिरला रानच्या गुहेत (हसतो) थोडा वेळ का होईना राजांचे लाखमोलाचे कपडे माझ्या अंगावर चढले. माझ्या जिवाचं सोनं झालं – – महाराज, महाराज माझं काम मी फत्ते केलं– – आता मला माझ्या मरणाची पर्वा नाही – – वाईट वाटून घेऊ नका – – हा शिवा आपल्यासाठी आणि स्वराज्यासाठी लाख वेळा जन्म घेईल – – आणि आपल्या सेवेला हजर होईल – – माझ्या जिवाचं सार्थक झालं. आता मी मरणाला तयार आहे. (सिद्दीकडे वळून) सिद्दी, आता चालव तुझी तलवार– –

**सिद्दी** : खामोश कंबख्त!

(शिवा स्वतःच्या पोटात कट्यार खुपसतो. दोन्ही हातांनी पोट धरून मागच्या खांबाचा आधार घेतो आणि अडखळत बोलतो)

**शिवा** : सिद्दी, अरे सोंगातला असलो तरी शिवाजी हाय मी– – मरायचंच झालं तरी मानानं मरेन. तुझ्या हातानं मरणार नाही.

(खांबाला धरून हळूहळू कलंडतो. पोटातून रक्त वाहू लागते. सिद्दी त्याच्याकडे पहात तसाच उभा रहातो. आणि निराशेने एकदम कपाळावर हात मारून खाली बसतो. बलिदानावरील एखादे गीत हळू आवाजात ऐकू येऊ लागते. हळूहळू आवाज मोठा होतो – –

(पडदा पडतो)

म. ग्रं. सं. ठाणे, वाचनालय शाखा.



IRBK-0115566